सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१०/४३०/४६५,
ई-मेल–desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : १०/एनजीपी/प्रवेशक्षमता/२०२०/ ७२६ दिनांक : 15 SEP 2020

**परिपत्रक / तात्काळ**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेची पडताळणी करणेबाबत**

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्र.२अ/एडीएम/२०२०/१८८, दि.३०/७/२०२०

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये आपल्या संस्थेबाबत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, परीक्षा मंडळाची संलग्नता इत्यादी माहिती ऑनलाईन पध्दतीने अद्ययावत करण्याबाबत कळविले होते. त्याअन्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता पदविका अभ्यासक्रम आणि त्यांची प्रवेश क्षमता इ.बाबतची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर अद्ययावत माहिती संस्थेमार्फत भरण्यात आली होती व सदरील माहिती तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत पडताळून निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेच्या अनुषंगाने मंजूर प्रवेश क्षमता व इतर अनुषंगिक माहिती संचालनालयाच्या संबंधित प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर दर्शविण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने संबंधितांना कळविण्यात येते की, या संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व पदविका संस्थांची संबंधित प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर दर्शविण्यात आलेली संपूर्ण माहिती संस्थेच्या प्राचार्यांनी व्यक्तीशः स्वतः तपासणी /पडताळणी करावी. सदर माहितीमध्ये काही तफावत/त्रुटी आढळल्यासच त्याबाबतची **माहिती फक्त diploma@dtemaharashtra.gov.in या ईमेलवरच दि. १८/०९/२०२० पर्यंत** सादर करावी. सदर प्रसिध्द केलेल्या माहितीबाबत दि. १८/०९/२०२० पर्यंत या संचालनालयास दिलेल्या इमेलवर त्रुटीसंदर्भात काहीही कळविण्यात आले नाही, तर संस्थेच्या प्राचार्यांनी सदर माहिती तपासली असून ती बरोबर आहे, असे गृहीत धरुन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेश करण्यात येतील, यांची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ )
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना :

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती / औरंगाबाद / मुंबई / नागपूर / नाशिक / पुणे. त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विभागातील सर्व संबंधित पदविका संस्था प्रमुखांच्या निदर्शनास आणावे.

२) कार्यासन क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई. यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक या संचालनालयाच्या संबंधित प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, तसेच पुढील उचित कार्यवाही करावी.

३) प्राचार्य / संचालक, शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका संस्था

E/Bhodekar/Letter

पृष्ठांकन क्रमांक : तंशिविकाअ/शिक्षण/परिक्षा/२०२०/ ७६२४
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दिनांक : १६/९/२०२०

सहसंचालक,तंत्रशिक्षण वि.का.
अमरावती.

प्रत:

१. प्राचार्य, सर्व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,अमरावती विभाग,अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता .

२. प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना विभागीय कार्यालयाच्या यांना ईमेल करण्याकरीता.